श्री. स्वप्नील सखाराम आंबेटकर,
तत्का.सेवानिलंबीत ग्रामसेवक, ग्रामपंचायत
चोंभुत ता.पारनेर येथे कार्यरत असताना
गैरव्यवहार व गैरवर्तण केले बाबत,
विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी
अधिका-याची नेमणूक करणेबाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ १०१ /२०२३
अहमदनगर, दिनांक - डिसेंबर २०२२
२०/१/२०२३

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/११-२०२२/ ७१८/२०२२, दिनांक- ०१/११/२०२२
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर यांचेकडील पत्र क्र. आस्था-१/१४३७/२०२२ दिनांक ११/१०/२०२२
३. श्री. स्वप्नील सखाराम आंबेटकर,ग्रामसेवक यांचा खुलासा दि. २/१२/२०२२
४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)

**आदेश**

ज्याआर्थी, श्री. स्वप्नील सखाराम आंबेटकर, तत्का.सेवानिलंबीत ग्रामसेवक, ग्रामपंचायत चोंभुत ता.पारनेर येथे कार्यरत असताना गैरव्यवहार व गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.१ अन्वये, दोषारोप ठेवणेत आले होते. सदरचे दोषारोप संदर्भ क्र. २ नुसार श्री. स्वप्नील सखाराम आंबेटकर, यांना बजावले असून असून त्यांनी संदर्भ क्र.३ अन्वये खुलासा सादर केलेला असून, श्री. स्वप्नील सखाराम आंबेटकर, यांनी त्यांचेवर ठेवलेले सर्व आरोप अमान्य केलेले आहेत. सबब, त्यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार श्री. आंबेटकर, यांचे विरुध्द संदर्भ क्र.४ मध्ये नमुद केलेनुसार चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

त्याआर्थी, मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर, उक्त नियमाच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या शक्तींचा वापर करुन श्री. स्वप्नील सखाराम आंबेटकर, तत्कालीन सेवानिलंबीत ग्रामसेवक, ग्रामपंचायत चोंभुत ता. पारनेर यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी म्हणून सहा. आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. तसेच विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील. तसेच चौकशी अधिका-यास संदर्भ क्र.४ मधील सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहून चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202301270600 20 असा आहे.

(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

सहा. आयुक्त, (चौकशी),
विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक

२/- सोवत श्री. स्वप्नील सखाराम आंबेटकर, तत्कालीन सेवानिलंबीत ग्रामसेवक, ग्रामपंचायत चोंभुत ता. पारनेर यांचे गैरव्यवहार व गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यवहार संचीका पृष्ठ क्र. १ ते या समवेत जोडले आहे. तरी चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत :- श्री. स्वप्नील सखाराम आंबेटकर, ग्रामसेवक,
व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी

संदर्भ : २/- सोबतचा आदेश श्री. स्वप्नील सखाराम आंबेटकर, ग्रामसेवक,यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

प्रत :- श्री.महादेव वामन भोसले, विस्तार अधिकार,(पंचायत ) पंचायत समिती पारनेर
प्रत :- निवड नस्ती.

(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहमदनगर